IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# छत्रापती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्ह्यातील सोयाबीन पिकाखालील क्षेत्र व उत्पादनाचा अभ्यास

**डॉ. जोगेंद्र रामराव गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापक,
भूगोल विभाग,
स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड.

**जळगावकर श्रद्धा बाबुराव**
संशोधक विद्यार्थी
भूगोल विभाग,
कला व विज्ञान महाविद्यालय,चुसाळा, बीड.

**सारांश:**

सोयाबीन हे एक महत्त्वाचे व्यावसायिक तेलबिया पीक आहे. अधिक पौष्टिकता, कमी कालावधीत पीक घेण्याची सापी पद्धत व बाजारात मिळणारा चांगला भाव व जमीन व हवामानाची अनुकुलता यामुळे अभ्यास क्षेत्रात शेतकरी सोयाबीन पीक तालुक्या-निहाय घेत आहेत. म्हणून प्रस्तुत शोध निबंधात जिल्ह्यातील सन २०२०-२१ ते २०२३-२४ या काळात तालुका-निहाय सोयाबीन पिकाखालील क्षेत्र व उत्पादनाचा आढावा घेऊन या पिकाखालील क्षेत्र व उत्पादनात झालेला बदल यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

- **बीजसंज्ञा:** कृषी, क्षेत्र, सोयाबीन पिक, उत्पादन, बदल.

- **प्रस्तावना:**

कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे.[१] भारतात कृषी व कृषीशी संबंधित व्यवसाय एकूण लोकसंख्येच्या ७० टक्के हून अधिक लोकांना उपजिविकेचे साधन प्रदान करते.[२] भारतीय कृषी बहुतांशी लोकांच्या उपजिविका व रोजगाराचे मुख्य स्त्रोत असल्याने कृषीला महत्त्व आहे.

जगाच्या कोणत्याही भागात कृषी व कृषी उत्पादन प्राकृतिक, सामाजिक व आर्थिक घटकांनी प्रभावित होते. कृषी भूमीचा वापर हा नैसर्गिक संसाधनांच्या मूलभूत रचनेचा एक घटक आहे.[३] कृषी क्षेत्रात भूमी हा एक महत्त्वाचा घटक आहे. कृषीत पिकांचे उत्पादन प्रामुख्याने विविध पिके घेण्यासाठी जमिनीच्या सुपीकतेवर अवलंबून असते. पीक पद्धती हा कृषी भूमीच्या वापराचा मध्यवर्ती घटक आहे.[४]

सोयाबीन जगातील महत्त्वापूर्ण तेलवर्गीय पीक आहे. भारताला सोयाबीन व प्रक्रियायुक्त पदार्थापासून दरवर्षी ८ हजार कोटी रूपयांचे परकीय चलन प्राप्त होत आहे. सोयाबीनची व्यावसायिक शेती भारतात मध्यप्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्र या प्रमुख  राज्यात केली जात आहे.[५] प्रथिनयुक्त हे पीक पोषण सुरक्षेत योगदान देते. हे प्रामुख्याने खरीप पावसावर अवलंबून असलेले पीक मुख्यत: मध्य आणि द्वीपकल्पिय भारतातील काळ्या जमिनीत घेतले जाते.[६] सोयाबीन हे महाराष्ट्रातील एक तेलबियांचे प्रमुख पीक झाले आहे. दरवर्षी साधारणपणे ३० ते ३५ लाख हेक्टर क्षेत्रावर या पिकांची  लागवड होत आहे. राज्यातील हवामान व जमिन या पिकाला अनुकुल आहे.[७] अभ्यास क्षेत्रात सन २०२३-२४ या वर्षात २९२७२ हेक्टरवर सोयाबीन पिकांची लागवड करण्यात आली.[८] एकंदरित सोयाबीन पिकांच्या लागवडीमुळे जिल्ह्यातील लहान शेतकऱ्यांच्या जीवनात सामाजिक-आर्थिक बदल होत आहे.

- **अभ्यास क्षेत्र:**

महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्ह्याचे स्थान आहे. जिल्हा १९° १८' ते २०°४०' उत्तर अक्षांश आणि ७४°३४' ते ७६°०४' पूर्व रेखांश दरम्यान स्थिर असून, जिल्ह्याला उत्तरेकडून जळगाव जिल्हा, पूर्वेस जालना जिल्हा, दक्षिणेस अहिल्यानगर व बीड जिल्हे आणि पश्चिम दिशेस नाशिक जिल्ह्याची सीमा लाभली आहे.[९] जिल्हा एकूण ०९ तालूक्यात विभागण्यात आला आहे. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १०१३६.६१ चौ. कि. मी. इतके आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण ३७०१२८२ इतकी लोकसंख्या व जिल्ह्यात १३५६ गावे समाविष्ट आहेत. जिल्ह्यातील लोकांचा कृषी हा प्रमुख व्यवसाय असून बहुतांश शेती ही पावसावर अवलंबून आहे.[१०]




- **शोध निबंधाची उद्दिष्ट्ये:**

  १) अभ्यास क्षेत्रातील सोयाबीन पिकाखालील क्षेत्राचा आढावा घेणे.

  २) जिल्ह्यातील सोयाबीन पिकांच्या उत्पादनाचा अभ्यास करणे.

- **माहिती संकलन आणि विश्लेषण:**

प्रस्तुत शोध-निबंधात दुय्यम स्त्रोतावर आधारित असून, त्यात विषयाशी संबंधित पुस्तके, शासकीय अहवाल, प्रकाशित शोधनिबंधे, साप्ताहिक, जिल्हा जणगणना अहवाल (२०११), जिल्हा कृषी अहवाल (२०२१-२०२४), जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०२१, २०२२, २०२३, २०२४), वेबसाईट इत्यादी व भौगोलिक तंत्रप्रणालीत नकाशा, आलेख, तक्ते, संगणक सॉफ्टवेअर व संकलित आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यकिय पद्धतीचा उपयोग केला आहे.

- **शोध-निबंधाची मर्यादा:**

प्रस्तुत शोध लेखात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सन २०२०-२१ ते २०२३-२४ या काळातील सोयाबीन पिकाखालील क्षेत्र व उत्पादनाचा आढावा घेऊन, सदर काळात सोयाबीन पिका अंतर्गत क्षेत्र व उत्पादनात आलेला बदल याचा अभ्यास केला आहे. ही शोध लेखाची मर्यादा आहे.

**विषय विमोचन:**

अभ्यास क्षेत्राचा प्रमुख व्यवसाय हा कृषी असल्याने, कृषीत तालूका-निहाय सोयाबीन पिकांची लागवड केली जात आहे. सन २०२०-२१ ते २०२३-२४ या काळातील सोयाबीन पिकाखालील क्षेत्र पुढील तक्त्यावरून

- **अभ्यास क्षेत्रातील सोयाबीन पिकाखालील क्षेत्र:**


**तक्ता क्र. १**

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयाबीन पिक क्षेत्र**

| अ.क्र. | तालूके | सोयाबीन पिकाखालील क्षेत्र (हेक्टरमध्ये) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२४-२४ |
| १ | कन्नड | ०८०५ | ३३०० | २४४७ | २५५० |
| २ | सोयगाव | २७५४ | २६६८ | ३०१५ | ३११५ |
| ३ | सिल्लोड | ३८०५ | ६६३८ | ८५३७ | ८८२२ |
| ४ | फुलंब्री | ०२९९ | ०७८१ | ०६०५ | ०४८९ |
| ५ | औरंगाबाद | ११२९ | ३०११ | ४२१० | ३६६५ |
| ६ | खुलताबाद | ०६२१ | २९४८ | २६१० | २९१३ |
| ७ | वैजापूर | ०८७६ | ५९६३ | ४२९० | ३९११ |
| ८ | गंगापूर | १०४६ | ३३२० | २७०४ | १५४३ |
| ९ | पैठण | १५४९ | २७४४ | २५४९ | २२६४ |
| एकूण जिल्हे | | १२८८४ | ३१३७३ | ३०९६७ | २९२७२ |

**स्त्रोत:** जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन (२०२१ ते २०२४) छ. संभाजीनगर जिल्हा

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयाबीन पिक क्षेत्र**




वरिल तक्ता व आलेखाच्या सहाय्याने अभ्यास क्षेत्रातील तालुका-निहाय सोयाबीन पिकाखालील क्षेत्राची सन २०२०-२१ ते २०२३-२४ या काळातील स्थिती दर्शविली आहे. जिल्ह्यात सन २०२०-२१ ते २०२३-२४ या काळात तालूका-निहाय सर्वाधिक एकुण सोयाबीन पिकाखालील क्षेत्र वर्ष २०२१-२२ मध्ये ३१३७९ इतके तर सन २०२०-२१ या वर्षात सोयाबीन पिकाखाली सर्वात कमी १२७७४ इतके क्षेत्र दिसते.

जिल्ह्यात वर्ष २०२०-२१ मध्ये २५०० ते ४००० हेक्टर दरम्यान सोयाबीन पिकाखालील क्षेत्र सोयगाव व सिल्लोड तालुक्यात आहे. १००० ते २००० दरम्यान क्षेत्र गंगापूर, औरंगाबाद आणि पैठण तालूक्यात आहे, तर २०० ते १००० हेक्टर दरम्यान क्षेत्र हे फुलंब्री, खुलताबाद, कन्नड आणि वैजापूर तालुक्यात दिसते. वर्ष २०२१-२२ मध्ये जिल्ह्यात ५००० ते ७००० हेक्टर दरम्यान सोयाबीन पिकाखालील क्षेत्र सिल्लोड व वैजापूर तालूक्यात आहे. २००० ते ४००० दरम्यान सोयगाव, कन्नड, औरंगाबाद, खुलताबाद, गंगापूर, पैठण तालुक्यात आहे, तर फुलंब्री तालुक्यात ७८१ हेक्टर क्षेत्र सोयाबीन पिकाखाली आहे.

जिल्ह्यात वर्ष २०२२-२३ मध्ये सर्वाधिक ८५३७ हेक्टर सोयाबीन पिकाखालील क्षेत्र सिल्लोउ तलुक्यात आहे. ४००० ते ५००० दरम्यान क्षेत्र औरंगाबाद व वैजापूर तालूक्यात आहे. २००० ते ४००० हेक्टर दरम्यान क्षेत्र कन्नड, सोयगाव, खुलताबाद, गंगापूर आणि पैठण तालुक्यात आहे तर फुलंब्री तालुक्यात ६०५ हेक्टर सर्वात कमी क्षेत्र दिसते. वर्ष २०२३-२४ मध्ये ८८२२ हेक्टर सर्वाधिक सोयाबीन पिकाखालील क्षेत्र हे सिल्लोड तालुक्यात आहे तर फुलंब्री तालुक्यात सर्वात कमी ४८९ हेक्टर क्षेत्र आहे.

- **ब) जिल्ह्यातील सोयाबीन पिकांचे उत्पादन (२०२०-२१ ते २०२३-२४):**


जिल्ह्यात सन २०२०-२१ ते २०२३-२४ या काळात सोयाबीन पिकांचे आलेले तालुका-निहाय उत्पादन पुढील तक्त्यात दिले आहे.

**तक्ता क्र. २**

**जिल्ह्यातील सोयाबीन पिकांचे उत्पादन**

| अ.क्र. | तालूके | सोयाबीन पिकांचे उत्पादन (मे. टनामध्ये) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
| १ | कन्नड | ११६६ | २५८० | २२४१ | १८५७ |
| २ | सोयगाव | ३२९२ | १०११ | ११०५ | १२०८ |
| ३ | सिल्लोड | १४२७ | ५५२८ | ७००७ | ६०७५ |
| ४ | फुलंब्री | ०३७५ | ०५४६ | ०५१६ | ०५८६ |
| ५ | औरंगाबाद | ६०९ | २२०९ | ४४४७ | २४५४ |
| ६ | खुलताबाद | १४७९ | १९८३ | १६६८ | २२३५ |
| ७ | वैजापूर | ५८८ | ४८७३ | ३४८२ | ३०८२ |
| ८ | गंगापूर | १०३८ | १५९५ | २२९३ | ०९५१ |
| ९ | पैठण | ९७९ | ०८०३ | १४८४ | १५२४ |
| एकूण जिल्हा | | १०९५३ | २११२८ | २४२४३ | १९९७२ |

**स्रोत:** जिल्हा कृषी कार्यालय, छ. संभाजीनगर-(२०२१-२०२४)




उपरोक्त तक्ता आणि आलेखावरून अभ्यास क्षेत्रात सोयाबीन पिकांच्या उत्पादनावरून असे दिसते की, २०२०-२१ ते २०२३-२४ या काळात सोयाबीन पिकांच्या उत्पादनात तालूका-निहाय वाढ व घट झाल्याचे दिसून

येते. सन २०२०-२१ मध्ये ३००० मे. टनच्या वर सोयाबीन पिकांचे उत्पादन सोयगाव तालुक्यात झाले. तर १००० ते २००० मे. टन दरम्यान कन्नड, सिल्लोड, खुलताबाद व गंगापूर तालुक्यात उत्पादन झाले. १००० मे टनाच्या आत फुलंब्री, औरंगाबाद, पैठण आणि वैजापूर तालुक्यात सोयाबीन पिकांचे उत्पादन झाले. जिल्ह्यात वर्ष २०२१-२२ मध्ये सर्वाधिक ५५२८ मे. टन सोयाबीन पिकांचे उत्पादन सिल्लोड तालुक्यात झाले तर इतर तालुक्याच्या तुलनेत सर्वात कमी ५४६ मे. टन उत्पादन फुलंब्री तालुक्यात झाले. सन २०२२-२३ मध्ये सर्वाधिक ७००७ मे. टन सोयाबीन पिकांचे उत्पादन सिल्लोड तालुक्यात तर सर्वात कमी ५१६ मे. टन उत्पादन फुलंब्री तालुक्यात झाले.

- **निष्कर्ष:**

१) जिल्ह्यात वर्ष २०२०-२१ मध्ये सर्वाधिक (३८०५ हेक्टर) सोयाबीन पिकाखालील क्षेत्र सिल्लोड तालुक्यात तर (२९९ हेक्टर) कमी क्षेत्र फुलंब्री तालुक्यात आढळून आले.

२) वर्ष २०२१-२२ मध्ये ६६३८ इतके सर्वाधिक सोयाबीन पिकाअंतर्गत क्षेत्र सिल्लोड तालुक्यात तर ७८१ हेक्टर इतके कमी क्षेत्र फुलंब्री तालुक्यात आढळले.

३) जिल्ह्यात २०२२-२३ या वर्षात ८५३७ इतके सर्वात जास्त सोयाबीन पिकाखालील क्षेत्र सिल्लोड तालुक्यात हाते तर इतर तालुक्याच्या तुलनेत कमी ६०५ हेक्टर क्षेत्र फुलंब्री तालुक्यात आढळून आले.

४) जिल्ह्यात २०२३-२४ मध्ये ८८२२ हेक्टर इतके सर्वाधिक सोयाबीन पिकाखालील क्षेत्र सिल्लोड तालुक्यात तर ४८९ हेक्टर इतके कमी क्षेत्र फुलंब्री तालुक्यात आढळले.

५) अभ्यास क्षेत्रात वर्ष २०२०-२१ मध्ये सोयाबीन पिकांचे सर्वात जास्त ३२९२ मे. टन उत्पादन सोयगाव तालुक्यात तर ३७५ मे. टन उत्पादन फुलंब्री तालुक्यात झाल्याचे आढळले.

६) जिल्ह्यात वर्ष २०२१-२२ मध्ये सिल्लोड तालुक्यात सर्वाधिक ५५२८ मे. टन सोयाबीन पिकांचे उत्पादन झाले तर इतर तालुक्याच्या तुलनेत सर्वात कमी ५४८ मे. टन उत्पादन फुलंब्री तालुक्यात झालेले दिसून आले.

७) जिल्ह्यात सिल्लोड तालुक्यात सर्वाधिक ७००७ मे. टन सोयाबीन पिकांचे उत्पादन वर्ष २०२२-२३ मध्ये झाले तर ५१६ मे. टन कमी उत्पादन फुलंब्री तालुक्यात झाल्याचे आढळून आले.

८) जिल्ह्यात वर्ष २०२३-२४ मध्ये सिल्लोड तालुक्यात सर्वात जास्त ६०७५ मे. टन सोयाबीन पिकांचे उत्पादन झाले तर ५८६ मे. टन कमी उत्पादन फुलंब्री तालुक्यात झाले.

९) अभ्यास क्षेत्रात तालुका-निहाय वर्ष २०२०-२१ मध्ये सोयाबीन पिकाखालील क्षेत्र १२८८४ हेक्टर होते, वर्ष २०२३-२४ मध्ये ते २९२७२ हेक्टर इतके झाले. म्हणजे १६३८८ इतके हेक्टर सोयाबीन पिकाअंतर्गत क्षेत्र वाढले.

१०) जिल्ह्यात वर्ष २०२०-२१ मध्ये तालुका-निहाय १०९५३ मे. टन सोयाबीन पिकांचे उत्पादन होते. वर्ष २०२३-२३ मध्ये १९९७२ मे. टन उत्पादन झाले. म्हणजे ९०१९ मे. टन इतके सोयाबीन पिकांचे उत्पादन वाढले.

अशा प्रकारे सन २०२०-२१ ते २०२३-२४ या काळात अभ्यास क्षेत्रात सोयाबीन पिकाखालील क्षेत्र व उत्पादनात तालुकानिहाय वाढ व घट झालेली असल्याचे निदर्शनास आले.

**संदर्भसूची:-**


१) Tambe Sudhir Tukaram (2020): 'A Study of Agriculture Geography an Overview of India' Journal of Applied Geology and Geophysics, Vol-8, Issue-5, P-13

२) Majid Husain (2017): 'Systematic Agricultureal Geography' Rawat Publication, Jaipur, P-312,314

३) Dhage Gotiram Ramesh and Jadhav Santosh Tukaram (2025): 'Geographical Study of Crop Combination in Nashik District Maharashtra State, India. 'International Journal For Multidisciplinary Research, Vol-7, Issue-1, P-1

४) Gade Dilip A. and Gavit Ramesh H. (2018): 'Agricultural Land use and Croping Pattern in Nashik District (MS)' Aayushi International Interdisciplinary Research Journal, P-700

५) भालेराव निशीकांत (संपा): 'आधुनिक किसान प्रगत शेतीची पाऊलवाट' प्रभाकर प्रिंट पॅक (प्रा.) लि. औरंगाबाद, पृ.२९

६) Govt. of Walfare Report on effective implementation of pradhan mntri Fasal Bima Yojana, P-95

७) मुसांडे वसंत (२०१४): शाश्वत समृद्धीसाठी सोयाबीन', सेंटर फॉर सस्टेनेबल लाइव्हलीहुड द्वारा दिलासा जनविकास प्रतिष्ठान, औरंगाबाद, पृ.१

८) महाराष्ट्र शासन (२०२४): 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन' जिल्हा छत्रपती संभाजीनगर, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, छ. संभाजीनगर, पृ.६४

९) Census of India (2011): 'District Census Handbook' Aurangabad District, Series-28, Part XII-A, P-11

१०) महाराष्ट्र शासन (२०२४): 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन' उपरोक्त, पृ. १२,१३,६४

११) महाराष्ट्र शासन (२०२१): 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन' जिल्हा औरंगाबाद, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, औरंगाबाद, पृ.७४

१२) महाराष्ट्र शासन (२०२२): 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन' जिल्हा औरंगाबाद, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, औरंगाबाद, पृ.७०

१३) महाराष्ट्र शासन (२०२३): 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन' जिल्हा छत्रपती संभाजीनगर, पृ.६५

१४) महाराष्ट्र शासन (२०१९-२०): कृषी अधिकारी' कृषी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, याच्याकडून प्राप्त कृषी उत्पादनाचा सांख्यिकी अहवाल.

१५) mahadesh.maharashtra.gov.in

१६) censusindia.gov.in

१७) pmfby.gov.in